# प्रेसनोट

नाशिक परिक्षेत्रातील जळगाव पोलीस घटकात पोलीस शिपाई भरती-२०१९ प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्यानुसार जळगाव जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर एकुण १२८ पदांसाठी दिनांक ०९/१०/२०२१ रोजी जळगाव शहर व भुसावळ शहर येथील ६८ केंद्रांवर एकूण २१६९० उमेदवारांची पोलीस शिपाई पदाकरीता १०० गुणांची बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. ज्या उमेदवारांनी जळगाव जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१९ करीता ऑनलाईन आवेदन अर्ज सादर केलेले आहेत, त्यांना ई-मेल द्वारे तसेच मोबाईल फोनवर संदेश पाठविण्यात आलेले असुन त्यांनी सदरहू संदेशामध्ये दिलेल्या लिंक वर क्लिक करुन आपले प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे किंवा https://nashikpolicebharti.in/ या संकेतस्थळावरुन आपले प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे. दि.०९/१०/२०२१ रोजी लेखी परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्र अनिवार्य असुन ज्या उमेदवारांकडे प्रवेशपत्र नसल्यास, त्यांना परीक्षा केंद्रात जाण्याची परवानगी देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधीत उमेदवारांनी व्यक्तीशः नोंद घ्यावी. सदर प्रेसनोट जळगाव जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत संकेतस्थळ www.jalgaonpolice.gov.in येथे देखील प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

**ठिकाण :- जळगाव**
**दिनांक :-** - 2 OCT 2021

पोलीस अधीक्षक जळगाव

**( डॉ. प्रविण मुंढे )**
**पोलीस अधीक्षक, जळगाव**